महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २३० वे | दिनांक : १५/०८/२०२६ | वार : शनिवार

## शेतकऱ्यांसाठी मोठी बातमी; २ ते ४ दिवसांत कर्जमाफीचे पैसे खात्यात



**वाशिम :** राज्य सरकारने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'ची प्रक्रिया सध्या वेगात सुरू आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जात आहे. मात्र, अद्यापही राज्यातील अनेक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात कर्जमाफीचे पैसे प्रत्यक्ष जमा न झाल्यामुळे, मदतीच्या प्रतीक्षेत असलेला बळीराजा सध्या चिंतेत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

शेतकऱ्यांच्या या परिस्थितीवर राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी वाशिम येथे बोलताना एक महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक माहिती दिली आहे. येत्या दोन ते चार दिवसांत कर्जमाफीचे सुमारे पाच ते दहा हजार कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले जातील, अशी मोठी घोषणा त्यांनी केली आहे. कृषिमंत्र्यांच्या या आश्वासनामुळे कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो शेतकऱ्यांना आता मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

सध्या 'ॲग्रीस्टॅक' प्रणालीच्या माध्यमातून कर्जमाफीच्या याद्या पडताळणीचे काम प्रगतीपथावर असून, शासनाकडे पुरेसा निधी उपलब्ध असल्याने जसजशा याद्या अद्ययावत होतील, तसतशी रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे. या संपूर्ण कर्जमाफी योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना एकूण ४० हजार ५८५ कोटी रुपयांचा मोठा लाभ होणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती दत्तात्रय भरणे यांनी वाशिम येथे दिली.

वाशिम येथे पत्रकारांशी संवाद साधताना, शहरी भागातील शेतकऱ्यांना सिंचन विहीर आणि इतर कृषी योजनांचा लाभ मिळत नसल्याची बाब पत्रकारांनी निदर्शनास आणून दिल्यावर दत्तात्रय भरणे यांनी यावर आपली प्रतिक्रिया दिली. या समस्येबाबत आपल्याला पूर्वकल्पना नसल्याची कबुली देत, येत्या काळात शहरी भागातील शेतकऱ्यांनाही शासनाच्या सर्व कृषी योजनांचा लाभ मिळावा यासाठी योग्य ती तरतूद निश्चितपणे केली जाईल, असे महत्त्वपूर्ण आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

ज्या शेतकऱ्यांची नावे सातबारा उताऱ्यावर किंवा इतर अधिकारात नोंदवली गेलेली नाहीत, अशा राज्यातील तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांना आता अधिकृत रेकॉर्डवर आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. या अत्यंत महत्त्वाच्या निर्णयामुळे या सर्व वंचित शेतकऱ्यांचा 'ॲग्रीस्टॅक' मध्ये समावेश होण्याचा मार्ग मोकळा होणार असून, आता त्यांनाही कर्जमाफीसह शासनाच्या इतर विविध कृषी योजनांचा थेट लाभ मिळवणे शक्य होणार आहे. या निर्णयाची तत्काळ आणि प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी येत्या १५ दिवसांच्या आत यासंदर्भातील सविस्तर अहवाल सादर करण्याचे स्पष्ट आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत.

## महाराष्ट्राच्या उद्योगक्षेत्राला घरघर; ५ वर्षांत ३६ हजारांहून अधिक कंपन्या बंद



**पुणे :** महाराष्ट्रात लाखो कोटी रुपयांची गुंतवणूक झाली व रोजगार निर्मितीही लाखोंच्या संख्येने होणार असल्याचा भाजपा महायुती सरकारचा दावा सपशेल फेल ठरलेला आहे. सरकारचे दावे हे कागदावरच असून भ्रष्टाचार, कमिशनखोरी आणि सत्ताधाऱ्यांच्या बगलबच्च्यांच्या गुंडगिरीमुळे महाराष्ट्रातील उद्योगधंदे बंद पडत आहेत किंवा ते इतर राज्यात स्थलांतर करत आहेत. गेल्या पाच आर्थिक वर्षांत राज्यातील ३५ हजार २११ खासगी कंपन्या बंद पडल्या आहेत. यामध्ये देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील १२ हजार १८१ कंपन्यांचा समावेश आहे,हे अत्यंत धक्कादायक आहे. भाजपा महायुती सरकारचे धोरण उद्योगधंद्यांना पोषक नाही, असेच यातून स्पष्ट होत आहे, असा घणाघाती हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

यासंदर्भात सरकारवर तोफ डागत हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, महाराष्ट्रातील किती उद्योग बंद पडले, ही माहिती केंद्रीय कॉर्पोरेट व्यवहार राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांनी लोकसभेत एका लेखी उत्तराद्वारे दिली आहे. मुंबई—पुणे—नाशिक पट्ट्यातील कंपन्या बंद होण्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे समोर आले आहे. सरकारचे आकडेच सरकारची पोलखोल करत आहेत पण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र हे मान्य करताना दिसत नाहीत. शब्दच्छल करून असे झालेले नाही हे सांगण्याचे केविलवाणा प्रयत्न ते करत आहेत. बंद पडलेल्या या कंपन्या डिफंक्ट कंपन्या आहेत असा फडणविसांचा दावा आहे, पण कंपन्या बंद पडल्या, हे सत्य त्यामुळे लपवता येत नाही आणि राज्यातील बेरोजगार तरुणांची वाढती संख्या पाहता गुंतवणूक कुठे झाली व रोजगार निर्मिती कुठे झाली, हा प्रश्न राहतोच. मग सरकार काहीही दावे करो, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

राज्यात एकीकडे उद्योगधंद्यांचा बारा वाजल्या असताना सरकारने अहिल्यानगरच्या श्रीरामपूर तालुक्यातील शेती महामंडळाची १५०० एकर जमीन एका मंत्र्यांच्या जवळच्या व्यक्तीच्या निबे ग्रुप नावाच्या खासगी कंपनीला अकृषिक वापरासाठी ५० वर्षे भाड्याने दिली आहे. कोणतीही निविदा न काढता ही जमीन खासगी कंपनीच्या घशात घालणे हा भ्रष्टाचारच आहे. अशाच पद्धतीने खुलेआमपणे जमिनी खासगी व्यावसायिकांना दिल्या जात आहेत. त्या जागेवर ना उद्योग उभे राहतात ना रोजगार निर्माण होतात, असेही हर्षवर्धन सपका यांनी म्हटले आहे.

पुढे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, मुंबईतल्या सगळ्या जमिनी विकून झाल्यामुळे सरकार आता ग्रामीण भागाकडे वळले आहे. गडचिरोलीच्या जमिनी खाण माफियांच्या घशात घातल्या आहेतच, आता अहिल्यानगरच्या जमिनी दिल्या जात आहेत. सरकार उद्योगाच्या नावाखाली फक्त जमिनी वाटत, भ्रष्टाचार करत सुटले आहे. महायुती सरकारने हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा असेही असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## गिरणी मैदानाच्या विकासकामाला गती; सोमवारपासून सपाटीकरणाला सुरुवात

**छत्रपती संभाजीनगर :** गिरणी मैदानाच्या विकासकामाला आता गती मिळाली आहे. रोशन गेट परिसरातील या मैदानाची विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे आणि जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. सोमवारपासून मैदानाचे सपाटीकरण करून ते मुलांसाठी खेळण्यायोग्य बनवण्याचे काम सुरू होणार आहे.

रोशन गेट आणि परिसरातील दाट लोकवस्ती लक्षात घेता, येथील मुलांना खेळण्यासाठी योग्य व सुरक्षित जागेची मोठी गरज होती. विरोधी पक्षनेते समीर साजिद बिल्डर आणि प्रभाग क्रमांक 13 मधील एआयएमआयएम (AIMIM) नगरसेवकांनी गिरणी मैदानाच्या विकासाचा प्रश्न सातत्याने प्रशासनासमोर मांडला होता.

आजच्या पाहणीदरम्यान, अधिकाऱ्यांनी मैदानाची सद्यस्थिती जाणून घेतली. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी सोमवारपासून सपाटीकरणाचे काम सुरू करण्याचे आश्वासन दिले. तसेच, परिसरातील नागरिकांच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन लवकरच पाण्याच्या टाकीच्या कामालाही सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

गिरणी मैदान विकसित झाल्यानंतर रोशन गेट आणि आजूबाजूच्या दाट वस्तीतील मुलांना आणि युवकांना खेळण्यासाठी सुरक्षित व योग्य जागा उपलब्ध होईल. प्रशासनाच्या या सकारात्मक निर्णयाचे परिसरातील नागरिकांकडून स्वागत होत आहे.

विरोधी पक्षनेते समीर साजिद बिल्डर, नगरसेवक उसामा सय्यद आणि प्रभागातील नगरसेवकांनी जनतेच्या या महत्त्वाच्या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे या विकासकामाला आता प्रत्यक्ष गती मिळाली आहे. जनतेच्या मूलभूत सुविधा, मुलांचे भविष्य आणि परिसराचा सर्वांगीण विकास यासाठी पाठपुरावा पुढेही सुरू राहील, असे त्यांनी नमूद केले.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १५ ऑगस्ट २०२६


## सोलार ऊर्जा प्लांट मधील ट्रान्सफॉर्मर मधील १० लाख ५६ हजार रुपये किमतीचे ऑइल चोरीस



**दौलताबाद (जावेद अहमद) :** दौलताबाद पोलीस स्टेशन अंतर्गत पेकळवाडी ता गंगापूर जी छत्रपती संभाजी नगर येथील गट क्रमांक ५६ येथे १६ एकर मध्ये माधव सोलार एनर्जी लिमिटेड या कंपनीचा सोलर प्लांट असून दिनांक ०३ ऑगस्ट ते दि ०४ ऑगस्ट रोजी रात्री साडेसात ते सकाळी दहा वाजे दरम्यान अज्ञात चोरट्यांनी १० लाख ५६ हजार रुपये किमतीचे ट्रान्सफॉर्मर मधील ऑइल चोरीला गेले असून ती १४ ऑगस्ट रोजी दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भारत सरकारच्या कुसुम प्रोजेक्ट योजने अंतर्गत पेकडवाडी येथे गट क्रमांक ५६ मध्ये गेल्या सहा महिन्यापासून माधव सोलर एनर्जी लिमिटेड चे काम सुरू असून येथील मुख्य टेक्निशन अजित पटेल हे दिनांक 3 ऑगस्ट रोजी संध्याकाळी साडेसात वाजे दरम्यान सर्व कर्मचाऱ्यांसोबत नित्याप्रमाणे आपापल्या घरी गेले दि ०४ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता कंपनीचे कर्मचारी राहुल कुमार यांनी अजित पटेल यांना फोन करून माहिती दिली की ट्रान्सफॉर्मर वरील प्लेट निघालेले असून ऑइलच्या पाईप उघडलेला आहे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने सदर ट्रान्सफर मधील ४८०० लिटर ऑइल किंमत १० लाख ५६ हजार रुपये किमतीचे चोरून नेले दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये सदर चोरीचा दि १४ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अजित दगडखैर करीत आहे

## राजीव गांधी महाविद्यालयात' राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत तिरंगा रॅली




**करमाड :** भारतीय संस्कृती संवर्धन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'स्वतंत्र भारताचा उत्सव' तसेच 'हर घर तिरंगा, घरघर तिरंगा' या अभियानांतर्गत आज भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन उत्साहपूर्ण वातावरणात तिरंगा रॅली काढली.'हर घर तिरंगा, घरघर तिरंगा', 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाविषयी आदर, देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांविषयी जनजागृती केली. प्रत्येक घरावर तिरंगा फडकावा आणि प्रत्येक भारतीयाच्या मनामध्ये राष्ट्रप्रेमाचा तिरंगा सदैव फडकत राहावा, हा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी तिरंगा रॅलीचे संचालन केले. यावेळी जिल्हा समन्वयक डॉ. कालिदास फड यांची विशेष उपस्थिती लाभली.यावेळी डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर, डॉ. नरेश डहाळे, डॉ. लक्ष्मण दांडगे, डॉ. जयश्री पाटील, प्रा.अर्जुन चव्हाण, प्रा. गणेश कुऱ्हाडे, डॉ.रमेश कचरे, डॉ. नितीन मुळे, डॉ. सौरभ चव्हाण, डॉ. अतुल मोरे, डॉ. अमित राऊत डॉ. नानासाहेब लावंड, रामचंद्र घोडके, डॉ. ललित गोल्ड, प्रा. प्रशांत माटे, डॉ. इम्रान पठाण, डॉ. लक्ष्मण खरात, प्रा. तन्मय भावसार, डॉ. किशोर काळे, प्रा. ज्ञानेश्वर कोठुळे, प्रा. प्रकाश बांगर, तसेच शिक्षकेतर कर्मचारी प्रसन्न वैद्य शिवकुमार मुक्तापुरे भगवंत देशपांडे, अविनाश साळवे,रमेश जाधव, कैलास जाधव, मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव, अलका कुलकर्णी, सुनीता पारेकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी परिसरातील नागरिकांना 'हर घर तिरंगा, घरघर तिरंगा' या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले. राष्ट्रध्वज हा केवळ कापडाचा तुकडा नसून देशाची अस्मिता, स्वातंत्र्य, त्याग, शौर्य आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे, हा विचार विद्यार्थ्यांनी आपल्या घोषणांमधून आणि सहभागातून प्रभावीपणे मांडला.स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करत नव्या पिढीमध्ये देशभक्तीची भावना रुजविणे, संविधानिक मूल्यांचा आदर निर्माण करणे आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. महाविद्यालय परिसरात तिरंग्याच्या सन्मानाने आणि देशभक्तीच्या उत्साहाने भारलेले वातावरण निर्माण झाले होते.'हर घर तिरंगा, घरघर तिरंगा' या घोषणेने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश देत तिरंगा रॅली उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाली.

## उमरगा येथे डी.एल.एड. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा येथील श्रमजीवी अध्यापक विद्यालयात सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षातडी.एल.एड.प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरूवात संगीत शिक्षक श्री.शफी मुल्ला सर व व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्यास्वागत गीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य श्री. भिमाशंकर सारणे यांनी केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळ, उमरगाचे संचालक, मा.श्री.मल्लिनाथ दंडगे होते. प्रमुखउपस्थिती म्हणुन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धाराशिव येथील ज्येष्ठ अधिव्याख्याता व अध्यापक विद्यालयाचेसमन्वयक मा.श्री.दिलीप जमादार उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापरकरुन लहान मुलांना शिकवण्याची कला आत्मसात करा. चांगले शिक्षक होण्याचे ध्येय ठेवा. ध्येय मोठे ठेवा आणिसातत्याने वाचन करत रहा. जितके अधिक वाचाल तितक्या प्रगतीच्या नव्या वाटा तुम्हाला सापडतील असेसांगितले.भविष्यात आधुनिक तंत्रज्ञानाची जाण असलेले गुणवत्तापुर्ण व आदर्श शिक्षक होण्यासाठी विद्यार्थ्यांनीप्रयत्न करावेत असे आवाहन त्यानी केले.व्दितीय वर्षाच्या विद्यार्थीनी कु.जोया पठाण व कु.अंकिता सुर्यवंशी यानी प्रथम वर्षातील नुतन विद्यार्थ्यांनाआपल्या अनुभवातुन मार्गदर्शन केले.डी.एल.एड. अभ्यासक्रमातील शैक्षणिक अनुभव विद्यालयीन जीवन आणिअध्यापन प्रक्रियबाबत त्यानी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.श्री.डॉ.राम सोलंकर प्राचार्य, आदर्श वरिष्ठ महाविद्यालय उमरगा यांनीआपल्या मार्गदर्शनपर भाषणात शिक्षक हा समाज घडविणारा आणि समाजाला योग्य दिशा देणारा महत्वाचाघटक आहे.तुम्ही केवळ एका अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेले नाही. तर एका अत्यंत पवित्र आणि जबाबदारीच्याव्यवसायाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे. भावी शिक्षकांनी आपल्या ज्ञानाचा व कौशल्याचा उपयोग करुनसमाजासह राष्ट्राच्या विकासात योगदान द्यावे.शिक्षक म्हणुन आपल्या अंगी चारित्र्यसंपन्नता,प्रामणीकपणा, संयमशिस्त आणि माणुसकी ही मुल्ये असली पाहिजेत कारण विद्यार्थी आपल्या शिक्षकाकडुन केवळ पुस्तकी ज्ञान घेतनाहीत तर शिक्षकाचे आचरणही अनुकरण करतात. म्हणुनच शिक्षकला राष्ट्रनिर्मीतीचा शिल्पकार म्हंटले जाते.असेप्रतिपादन केले.कार्यक्रमाच्या शेवटी अध्यापकाचार्य श्री धनराज हळमजगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्यायशस्वीतेसाठी अध्यापकाचार्य सौ.संगीता हिंगमीरे, श्री. बळीराम माने, श्री. शरणप्पा मुलगे श्री.अलिम शेख तसेचव्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी परीश्रम घेतले.पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १५ ऑगस्ट २०२६


## दिस सोनियाचा

दिस सोनियाचा गोड आज पहा उगवला
ध्वज तिरंगा गर्वात उंच नभी फडकला..

जग झोपेत हो सारे मिटे सारा हो अंधार
सूर्य घेऊनी प्रकाश आज आला भुईवर..

इथे रक्ताच्या नद्यांनी घडविला इतिहास
भूमी रंगली रक्तात स्वातंत्र्याची तिला आस..

खूप भोगल्या यातना अन् जुलमी वेदना
भूमी केली हो गुलाम हरवल्या संवेदना..

जाग येता भुमीपुत्रा सारे झाले एक आता
युद्ध स्वातंत्र्याचे सुरु नारा चलेजाव देता..

क्रांतीपर्व सुरु होता कापे फिरंगी शासन
काळे पाणी भोगण्याचा मिळे पुत्रास सन्मान..

राजगुरू व भगत सुखदेव मोठा भाऊ
होई शहीद हसत गुण आज त्यांचे गाऊ..

नेता सुभाष आमुचा नाही तयास रे जोड
सेना हिंद ती आझाद युद्ध करी अवघड..

देता प्राणाची आहुती तेव्हा मिळे हो आजादी
आज देश माझा पुढे शोभे साऱ्या जगामधी..

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903


## ख्रिस्ती कृती समिती महाराष्ट्र यांचा राजेंद्र दाते पाटील यांच्या अन्नत्याग आंदोलनास सक्रिय पाठिंबा




**छत्रपती संभाजीनगर :** शाश्वत मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने ज्येष्ठ आरक्षण अभ्यासक राजेंद्र दाते पाटील विभागीय आयुक्तालयासमोर आमरण उपोषणाला बसले आहेत. शुक्रवारी सहाव्या दिवशी ख्रिस्ती कृती समिती महाराष्ट्र यांनी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या अन्नत्याग आंदोलनास सक्रिय पाठिंबा दिला असुन त्यांची बिघडती प्रकृती पाहता शासनाने तात्काळ दखल घ्यावी नसता आम्ही सुद्धा संख्येने आंदोलनात सहभागी होऊ असा इशारा ख्रिस्ती कृती समिती महाराष्ट्र यांचे वतीने विजय गुड्डू निकाळजे यांनी दिला असुन या पाठिंबा देण्याच्या कार्यक्रमास शेकडो ख्रिस्ती बांधव उपस्थित होते त्यात रेव्ह. डॉ अब्राहम घुमारे, फादर विजय पांढरे, रेव्ह नितीन गायकवाड, पास्टर वसंत नाडे, पास्टर संदीप खेत्रे,पास्टर राजु भंडारी,पास्टर विनोद नवगिरे, पास्टर शिलास मोरे,सदानंद घोरपडे, ब्रदर सॅमसंग जॉनसन श्रीसुंदर,रेव्ह ताकवलेअशी अनेक मान्यवर व समाज बांधव उपस्थित होते.मराठा आरक्षणाची शासनाने भूमिका स्पष्ट करावी, एसईबीसी प्रवर्गाला ओबीसी प्रमाणे शिक्षण, नोकरी, शिष्यवृत्ती, शुल्क सवलत व शासकीय योजनांचा लाभ द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घेणे, सारथी संस्थेला पाच हजार कोटी,अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला दहा हजार कोटी रुपयांचा निधी देणे, प्रलंबित उमेदवारांना तातडीने नियुक्त्या देणे आणि कायगाव येथे मराठा हुतात्मा स्मारक उभारणे, या मागण्या बाबत ख्रिस्ती कृती समितीने जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या अन्नत्याग उपोषणास पाठिंबा दिला आहे.या प्रसंगी मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अप्पावाडीत अकरा फुटी ध्यानस्थ महादेव मूर्तीचे अनावरण



**दौलताबाद (जावेद अहमद) :** श्रावण मासानिमित्त पंढरपूरहून आणलेल्या आकर्षक मूर्तीची प्राणप्रतिष्ठा; दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दीश्रावण महिन्याच्या मंगलमय पर्वावर अप्पावाडी छत्रपती संभाजीनगर येथे नवनिर्मित अकरा फूट उंच ध्यानस्थ भगवान महादेवाच्या भव्य मूर्तीचे संत-महंत आणि गुरुजनांच्या उपस्थितीत मंत्रोच्चारात अनावरण करण्यात आले. पंढरपूर येथून आणलेल्या या मूर्तीची विधिवत पूजा, अभिषेक आणि वेदमंत्रांच्या घोषात शोभायात्रा काढण्यात आली. पाच गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली हे सर्व धार्मिक विधी पार पडले.या सोहळ महामंडलेश्वर 1008 डॉ विशालचंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली, चेतन तायडे यांच्या अध्यक्षतेखाली, धर्मपीठ सिंहासनाधीश्वर श्री श्री श्री 1008 सद्गुरू शिव रुद्रानंद महास्वामीजी, 108 डी. विरूपाक्ष शिवाचार्य महाराज, महामंडलेश्वर डॉ. प्रदीप चैतन्य फाले महाराज, सचिन मढेकर महाराज, महामंडलेश्वर आळंदीकर महाराज, सोमनाथ रत्नपारखी, मिलिंद सिसोदे, दुर्गादास महाराज, शांतिनाथ आप्पा सदावर्ते, अशोक आम्ले, डॉ. दिवाकर कुलकर्णी, डॉ. जीवन राजपूत, लक्ष्मण लिभारे, ईश्वर लिभारे,प्रशांत तारगे, चंद्रकांत रत्नपारखी,प्रशांतराव चंद्रमोरे, श्रीरामजी धस, रामअप्पा लिभारे आदी मान्यवर आणि भाविक उपस्थित होते.प्राणप्रतिष्ठा सोहळ्या दरम्यान वेदमंत्रांचा गजर आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसरदुमदुमून गेला होता. भाविकांनी महादेवाचे दर्शन घेत सुख, समृद्धी आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली. ही भव्य मूर्ती आता अप्पावाडी परिसरातील प्रमुख आकर्षण ठरत असून भाविकांसाठी हे एक नवीन श्रद्धास्थान म्हणून विकसित होत आहे.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लक्ष्मणअप्पा लिंभारे, ईश्वरअप्पा लिंभारे, रामअप्पा लिंभारे यांच्यासह सर्वांनी प्रयत्न केले आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १५ ऑगस्ट २०२६


## कालिकादेवी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी नशामुक्तीची घेतली शपथ



**(शिरूर कासार) :** 'आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित, कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, शिरूर (का.)पोलीस ठाणे व कालिकादेवी विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय नशामुक्ती जनजागृती अभियान-२०२६' राबविण्यात आले.यावेळी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब तसेच शिरूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मा.राजेश गडवे साहेब,यांच्या उपस्थितीत सामुदायिक 'नशामुक्तीची शपथ' घेण्यात आली.विशेषतः 'नशामुक्ती जनजागृती व बाल गुन्हेगारी' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान घेण्यात आले.यावेळी प्रमुख वक्ते मा.राजेश गडवे साहेबांनी 'आपला संकल्प,आपले भविष्य' घडविण्यासाठी विद्यार्थी युवक व समाजातील नागरिकांनी नशामुक्त भारत घडविण्यासाठी तंबाखू, गुटखा, सिगारेट, गांजा, अफू, भांग, दारू अशा अमली पदार्थांपासून अलिप्त राहिले पाहिजे.कारण अशा व्यसनामुळेच समाजात बाल गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. म्हणून विद्यार्थी जीवनापासूनच आपण सर्वांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली पाहिजे.अशी अपेक्षा व्यक्त केली.तसेच विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितले की,'युवा वर्गात' व्यसनांचे प्रमाण झपाट्याने वाढत चालले आहे.अमली पदार्थांच्या सेवनांने आपले आरोग्य धोक्यात येऊ शकते ; त्यामुळे आपण व्यसनाच्या आहारी न जाता आरोग्यदायी जीवन जगावे,आणि जीवनात यशस्वी व्हावे. त्याचबरोबर आपण सर्वांनी शासनाच्या 'राष्ट्रीय नशामुक्ती अभियानात' सक्रिय सहभाग घेऊन या अभियानाला यशस्वी करावे,असा महत्वाचा सल्ला दिला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.नारायण तांबे सर यांनी केले.याप्रसंगी विद्यालयातील उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होतीतेव्हा शिरूर (का.)पोलिस ठाणे व कालिकादेवी विद्यालयाने याकामी पुढाकार घेतला आहे.म्हणूनच पोलिस दलाच्या वतीने "अमली पदार्थ विरोधी सप्ताह" अनुशंगाने शिरूर (का.) तालुका 'नशामुक्त अभियान' राबविण्यात आले.यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने पर्यवेक्षक जनार्दन काळे तसेच विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तिरंगा

स्वातंत्र्याचा सोहळा
आपण साजरा करूया
घरोघरी तिरंगा फडकवूनी
क्रांतिकारकांना वंदन करूया

स्वातंत्र्याच्या शुभदिनी
करूया शहिदांचे स्मरण
देशाप्रती बाळगू निष्ठा
ठेवूया तिरंग्याचा मान

केशरी,पांढरा, हिरवा
रंग आमच्या तिरंग्याचा
त्याग,शांती, समृद्धी
अभिमान राष्ट्राचा

फडकणारा आमचा तिरंगा
गगनी झेप घेई
तिरंगा आमचा विश्वव्यापी
समृद्धीचे गीत गाई

हाती घेता तिरंगा
आनंद मिळतो न्यारा
भारत माता की जय
एकच गुंजतो नारा



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## करू पुन्हा पुन्हा सलाम

सदोदित आठवावे
शूर वीरांचे बलिदान
देशासाठी लढताना
केले हो जिवाचे रान. १
प्राणपणाने झुंजतांना
स्वातंत्र्यासाठी अडला
सळो की पळो करतांना
गोऱ्या लोकांना नडला. २

रक्त सांडले देशासाठी
दिले हसत बलिदान
सदा आठवावे त्यांना
दिले देशाला जीवदान. ३

सैनिक माझा लढतो
आहे सीमेवर दिनरात
अहो प्राणपणाने लढून
उधळून देतो घातपात. ४

शूरवीर सैनिकांना आपल्या
सदोदित करूया प्रणाम
शौर्यास आठवून त्यांच्या
करू पुन्हा पुन्हा सलाम. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## कुत्र्याच्या तावडीतून ऋषिकेशचा जीव वाचवण्यासाठी नगमा शेखचे धाडस



**दौलताबाद (जावेद अहमद) :** कुत्र्याच्या तावडीतून ऋषिकेश चा जीव वाचवण्यासाठी स्वतःची जीवाची पर्वा न करता नगमा शेख ने धाडस दाखवून कुत्र्याच्या तावडीतून वाचविलेऋषिकेश अमोल पाखरे वय बारा वर्षे राहणार वरुडकाजी छत्रपती संभाजीनगर हल्ली मुकाम दौलताबाद हा आपले मामा मधुकर निकाळजे यांच्या कडे शालेय शिक्षणासाठी आलेला आहेदि १३ गुरुवारी सकाळी ऋषिकेश हा आंबेडकर नगर दौलताबाद येथील किराणा दुकानात काही समान आणण्यासाठी गेला होतासमान घेऊन परत येत असताना गल्लीतील दोन कुत्र्यांनी त्याच्यावर हल्ला चढवला हा प्रकार गल्लीतील राहणारी नगमा कदिर शेख या महिलेने आपल्या घरातील सी सी टी व्ही तपहिला तर गल्लीत दोन कुत्रे एका मुलावर हल्ला करत आहे नगमा ने आपल्या जीवाची पर्वा न करता ऋषिकेशच्या मदतीला धावून जाऊन त्याला कुत्र्याच्या तावडीतून सुटका केली तोपर्यंत ऋषिकेश ला कुत्र्यांनी मांडीवर खांद्यावर ,मानेवर,व कानाचे लचके तोडलेले होते त्याला उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आता तो घरी आला आहे काही महिन्यांपूर्वी याच कुत्र्यांनी आहील कदिर शेख वय ०८,तुषार रामेश्वर गायकवाड वय ०९,अर्षद समद शेख वय १२,अबुजर अतिक शेख वय ०६,अली तोफिक शेख वय ०३,नुमान आरिफ कुरेशी वय ०७ वर्ष यांच्यावर सुद्धा कुत्र्यांनी हल्ले केले असल्याचे पालकांनी सांगितले आहेया हल्ल्या नंतर मुले व पालक यांच्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे मोकाट कुत्र्यांचा प्रशासनाने बंदोबस्त करावा अशी मागणी पालकांनी केली आहे


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १५ ऑगस्ट २०२६


## धर्म कुणाचा, त्याग कुणाचा?

नेत्याचा मुलगा
विदेशात शिकतो,
आधुनिकतेच्या विद्यापीठात
भविष्य घडवतो...

आणि इथे—
झोपडीत राहणाऱ्या माणसाला
धर्म वाचवण्याचे धडे देतो!

नेत्याची मुलं
उद्योगपतींच्या बरोबरीने
व्यवहाराची भाषा बोलतो,
गरिबाच्या लेकराला
“पहिला धर्म जप,
बाकी सगळं होत राहील!”
आदेशित करतो.

काय गंमत आहे ना?
तुमच्या मुलांच्या हातात
परदेशी विद्यापीठांची पदवी,
आमच्या मुलांच्या हातात
धर्माच्या नावाची पोथी!

तुमच्या घरात
व्यवसायाचे गणित,
आमच्या घरात
उपवासाचे गणित!
तुमची मुलं

नोकऱ्या नाही,
तर नोकऱ्या देण्याची स्वप्नं पाहतात;
आणि आमच्या मुलांना
स्वप्न पाहण्याआधीच
धर्म शिकवला जातो!

धर्माचा इतका असेल अभिमान
तर आधी सांगा तुमच्या मुलांना—
“तूही कर त्याग,
तूही जग साधं,
तूही रहा याच झोपडीत,
मग आम्ही तुला धर्माचा धडा ऐकू!”

गरिबाच्या पोटात भूक,
हातात नाही काम ,
डोक्यावर नाही छप्पर— भाषण मात्र
धर्माच्या रक्षणाचं!

धर्म जर माणसाला
माणूस बनवत नसेल,
तर त्या धर्माच्या नावावर
गरिबाला गप्प बसवण्याचा
अधिकार कुणी दिला?

धर्म तुमचा असेल,
तर प्रश्न आमचेही आहेत!
देश तुमचा असेल,
तर हक्क आमचेही आहेत!
आणि भविष्य तुमच्या मुलांचे असेल,
तर आमच्या मुलांचं भविष्य
धर्माच्या नावावर
गहाण ठेवणार कोण?

नेत्यांच्या मुलांना
शिक्षण हवं,
गरिबांच्या मुलांना
फक्त पोकळ संस्कार?

नाही
आता धर्माचा उपदेश नको,
शिक्षण द्या!
भक्तीचा डोस नको,
रोजगार द्या!
स्वर्गाची स्वप्नं नको,
जगण्याची संधी द्या!

कारण—
भुकेल्या माणसाला
धर्म शिकवण्याआधी
त्याच्या ताटात भाकरी ठेवा;
मग तो स्वतः ठरवेल
त्याला कोणता धर्म जपायचा!

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**
**छत्रपती संभाजीनगर**

## विठ्ठल साई परिसर मुरूम ऐतिहासिक वृक्षारोपण : बारा तासांत दीड लाख रोपांची लागवड, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसाठी प्रयत्न !




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र शासनाचे "हरित धाराशिव अभियान २.०" अंतर्गत उमरगा तालुक्यातील विठ्ठल साई सहकारी साखर कारखाना परिसरात भव्य आणि महत्त्वाकांक्षी वृक्षलागवड मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत अवघ्या बारा तासांत (सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत) तब्बल १ लाख ५० हजार रोपांची लागवड करून एक नवा विक्रम प्रस्थापित करण्याच्या दिशेने यशस्वी पाऊल टाकण्यात आले आहे. ही विक्रमी मियावाकी घनवन लागवड गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदवली जाण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत.विठ्ठलसाई साखर कारखाना परिसरातील एकूण १० वेगवेगळ्या साईट्सवर, ५ हेक्टर क्षेत्रावर ही लागवड करण्यात आली. प्रति साईट १५, प्रमाणे एकूण १,५०,००० रोपांचे रोपण करण्यात आले.या मोहिमेत पर्यावरण संवर्धनाचा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून तब्बल ५० प्रकारच्या विविध प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली आहे.जिल्हा प्रशासन, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, धाराशिव, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (ता. १४) रोजी हा उपक्रम पार पडला.या भव्य वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजना समिती अध्यक्ष शरण पाटील, उपविभागीय महसूल अधिकारी दत्तू शेवाळे यांच्यासह धाराशिव चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुंभार, सहाय्यक वनसंरक्षक रोहिणी शिनगारे, लोहारा चे तहसीलदार रणजीतसिंह कोळेकर, उमरगा चे तहसीलदार गोविंद येरमे, सहाय्यक गटविकास अधिकारी जगदेव वगे, विठ्ठल साई कारखान्याचे कार्यकारी संचालक सुरेश गवसणे, वनपरिक्षेत्र अधिकारी गजानन शिंगणकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी वनस्पती तज्ञ डॉ. संजय बिराजदार, डॉ. दिगंबर चव्हाण, डॉ. राम बजगिरे, वनरक्षक गजानन दांडगे, अरुण चौघुले, सूर्यकांत माळी, विवेक गंगणे, वैभव पानसरे, विशाल धनके आदींनी पुढाकार घेतला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विविध शासकीय विभाग, महाविद्यालये, शाळा आणि सामाजिक संस्थांनी मोठा पुढाकार घेतला. श्री माधवराव पाटील महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, प्रतिभा निकेतन माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसी (उमरगा), मातोश्री पॅरामेडिकल कॉलेज, बी एस एस महाविद्यालय, माकणी येथील प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा सहभाग उल्लेखनीय ठरला. संत निरंकारी चॅरिटेबल ट्रस्ट (दिल्ली - सोलापूर झोन, मुरूम ब्रँच) चे क्षेत्रीय संचालक बाळासाहेब पवार, प्रचारक चंद्रकांत चव्हाण, मुखी दयानंद साखरे, प्रा. डॉ. महेश मोटे, सुनील पिसके, हरिकिशन पवार, अमोल साबळे, सेवादल इन्चार्ज बिरु बंदीछोडे तसेच सेवादल महात्मे व बहिणजी श्रमदान करत वृक्षारोपणात सक्रिय सहभाग घेतला. विठ्ठल साई कारखाना, वन विभाग, पंचायत समिती, तहसील कार्यालय आणि कृषी विभाग, लोहारा यांच्या संयुक्त नियोजनामुळे हा महायज्ञ यशस्वीपणे पार पडला.वन विभाग, प्रशासन आणि नागरिकांच्या या अभूतपूर्व सहकार्यामुळे उमरगा तालुक्यात पर्यावरणपूरक संस्कृतीचा एक आदर्श पायंडा पडला असून, या विक्रमी उपक्रमाने संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले आहे.





महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १५ ऑगस्ट २०२६

# उलट्या कडीचं घर - सखेद घुसमटीचा कल्लोळ




कविच्या अर्पण पत्रिका ही सम्यक संबुध्दांच्या मध्यम मार्गाचे आचरण आहे जसे"तुझ्या जादुई बोटाचा स्पर्श झाला/अन् जमीन मला उभं राहण्यासाठी/मदत करु लागली/आजी तू हसली की/बुध्द सारखी दिसू लागली" (अर्पण)कवी सुनील दा उबाळे यांची ही अस्सल वेदनेची कविता.कविता होऊन जगणं आणि जगण्याचं निस्सीम खडतर जगणं.भिंती रंगविताना संयत शब्दांगार घेऊन ही कविता आली आहे.प्रतिमा प्रतिक असे नाहीच एक सृजनशील भावनेचा उद्रेक इतक्या सहजपणे जबरदस्त काव्यशैली मनाचा तळ ढवळून काढणारी ही कविता.अनुभवाचा सच्चेपणा निर्विवाद सत्य भंयकर वास्तवाची कडी उलगड ही कविता जगण्याचा स्वर देऊन जाते.रंगसंगती जशी तशी ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल वर्तमानची भूमिका देऊन जाते.आत्मकलह नाही तर धारदार निर्धाराने मनाचे मनोविश्व ही कविता देऊन जाते.जसे"असंख्य तज्ज्ञांचे दावे/उधळून लावलेस तू/आणि अजरामर केलंस माझं/करंट जगणं/उलट्या कडीच्या घरात"(पृ.१६) ही अदम्य् इच्छा पेरणारी कविता आहे.'आग पोटात ठेवण्याची गोष्ट'असं अगतिक वेदनेच्या प्रवाहत बिनदिक्कत निर्धाराने लढणे फक्त मनाचा सोस मनात ठेऊन ही सविनय सामंजस्याची कैफियत.'मी जमिनीशी नातं तोडून'सुख आणि दुःख ही जुळी भावंडे यांच्याशी जन्मनाळेची बांधिलकी तर आहेच 'मी माहेर नसलेला माणूस आहे'ही सखेद वेदनेची शृंखला आहे.नाळ तुटली,मायेचा पदर नाही, शाबासकीची थाप नाही,हे मायेचे आगर नसलेला ही कविता ओंजळभर दुःख देऊन जाते.'भाकर' खेळत्या वयात भाकर लपून ठेवली.खेळने कुदणे राहून गेले कवी म्हणतो "माझा विश्वास उडून गेलाय/शून्यातून जग घडविणाऱ्या/माणसांवरचा"(पृ.२०)इथल्या व्यवस्थेने मनावर जे शब्द बिंबवले आहे.पण ज्याचे जळते त्यालाच कळते.या जगण्याच्या दहाकतेच रुदण कायमचं आहे.ही कवितेची ओळ मनातल्या अजिंठ्याच्या शिल्पंकलेचा दाखल देणारी ही कविता.'पडक्या दिवसांची गोष्ट'अतिशय पोरक्या गरीबीची गोष्ट,वाळलेल्या भाकरीचे तुकडे भाजून खाणे या फाटक्या आयुष्यावर हसणे आजचे सारं आयुष्य कविता होऊन जाणे.तर 'विषारी स्वप्नांच्या दंशानंतर.ही युगाची वेदना आहे.पण एक सृजनशील नशा गरजेची असते ही कविता दिवसभराच्या झिंगलेल्या मेंदूला मुठमाती देऊन जाते.म्हणून कवी शब्दांची नशा उतरू देतं नाही.जसे 'माझी झोळी फाटू देऊ नकोस..'ही कवितेची अदम्य् विश्वासाची कविता आहे.जगण्यातला रंग, उध्वस्त आयुष्य,पाखरांची ओळ, पायाखाली जाळ, मुठभर शब्दांच दान,घर फिरलं तरी मन शाबुत राहिले पाहिजे.हेकवितेच बलस्थान आहे.'शाळा'या ही सविनय संकल्पना फक्त मनातच कवी घेऊन राहिले पण शाळा शिकता आली नाही ही सखेद वेदनेची लकेर आहे.उपासपोटी नाही घेतायत कुठलीचं भूमिका.भूकेच्या प्रश्नात उसणवारीचे गळफास व नंतर शब्दाचा विश्वासघात नाही करता येतं कधीच ही कवितेवरची निष्ठावंत निस्सीम काव्य भूमिका हे या कवितेचे वैशिष्ट्य.'मी कबरी खोदल्यात स्मशानात'हा काव्य उत्खननाचा मूर्तीवंत अनुभव, दुःख अंगबर बिलगने कवितेसारखे,मुठभर खिशात माती घेणे, म्हणून कवी लिहितो "मला जाळून काही होणार नाही/आणि/पुरल्या नंतर ही उगवेल मी/मी कविता पाहिलेला जादूई माणूस आहे"(पृ.३१)अशी ही मनस्वी ह्दयाकिंत कविता आहे.'याजत्राळलेल्या शहरात,फकिरी,मी कधीच थांबलो नव्हतो,घर उपाशी झोपू नये म्हणून,या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे समकालीन वास्तवाचे सम्यक भान देऊन जाणारी ही एका सृजनशील स्नेहाळू माणसाची सच्या इमानाची कविता आहे.जसे"स्वाभिमान कुणाची भाकर/होत नसते/आत्मसन्मान गधाड्यांच्या/दावणीला बांधून/जगावं लागतं हल्ली"(पृ.३६)अशा 'उन्हाच्या साऱ्या कहाण्या, कब्रस्तानात दफन करत, देहाच्या अजिंठ्यात ध्यानस्थ कविता या प्रतिमा परिप्रेक्ष्यात ही कविता चिंतन चिकित्सक भूमिकेतून येते.'माझं सारं अस्तित्व, आपण आपल्याच चितेवर,ही गोष्टच तेव्हाची आहे, एखाद्या सुफी संतासारखी,या कवितेने ही फकिरी, दुःखाचा पारा,निर्वानाची भाषा केली आहे,जगाची नजर मिळविने,स्वअस्तित्व दाखवणे,ही मायाळू स्नेहाळू फुंकर म्हणजे कवीचे निःसंग होऊन आत्मानुभूती घेणे हे आवसान या कवितेने दिले आहे.'घुसमट, घर तुटल्याचे फर्मान, असंख्य टाके मारुनही, तक्रार कधीच करणार नाही,ही कविता व्यवस्थेच्या तोंडावर घुसमट थुंकून देते.घराच्या भिंती मायेची ओलं देतात,टाके मारुन आठवण शिवणे,कामी आलो याचे समाधान,'बनावटी सोन्याची झळाळी' काही गमावलं नाही याचं समाधान व्यक्त होतं मी जिंकूनही गमावलं,त्यागाच्या सात नद्या, निःसंग त्याग आहे म्हणून कर्माची तळपती धग आहे.दिवसभर बैलासारखं थांबल्यावर ही,ही कामगारांच्या घामाचा पैसा बुडविणारीपैदास,नामशेष झाल्या उजेडाच्या कहाण्या,याकविता कवीच्या जगण्याच चिंतन आहे.'हा जन्म सार्थकी वाटतो!!'युगानुयुगांच्या जातीयतेच्या पाळूत चेंमटून जगण्याची लाचारी होती.विश्वरत्न बाबासाहेबांनी ही सर्वहरा समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण अक्षर संजीवनी मिळाली.गावकुस सोडले शहराच्या अंगणात शिक्षणाची रांगोळी रेखाटली आहे म्हणून "मरणाची भीती तर/कधीच वाटली नाही../पोट भरलेली लेकरं/पाहिली की,/हा जन्म सार्थकी वाटतो!!"(पृ.५४)ही खऱ्या श्रमीक श्रद्धेची कविता.'दिवसभर ऊन पिणारी पत्रे.. तळपत राहणं,मांजराचं पिल्लू गाडीच्या मागच्या चाकात हे दुःख,रक्त पांढरं झाल्यावर,हा कुठला आरसा,घरका पाठमोरं होतं, नदीच्या आत,आपलीच पाठ दिसली नाही कधी, वेदनेचे महाकाय जंगल,मी स्वतःला धुवून घेत असतो, तुम्ही सगळ्यांनी बोलावं, आपल्या पोलादी हाताने, रक्त तपासून पाहावं, माझ्या वाट्यातला अंधार, माणूस,आपणच शेवटचं पाहत असतो,जोडवं होऊ दे कविते,मी बहिणाबाईंच्या जात्यातून काही शब्द वेचल्यानंतर या कवितेने मानवी मनाची नितांत श्रद्धा म्हणजे समग्र आंबेडकरी विचार व कामगारांच्या धुमस्त्या तळहाचा अंगार आहे.'एक जळतं लाकुड,मी कवितेच्या कानात सांगून बसलोय,माझा बल्ड ग्रूप कविता पल्स आहे.करुणेनं लदबदलेलं जगणं,आणखी काय हवं असतं, जगण्याचे संदर्भ, कविच्या जगण्याचा अर्थ उलगडून दाखविताना "कोण कविता लिहितं /कोण कविता जगतं/माहीत नाही मला/माझा ब्लड ग्रुप कविता पल्स आहे"(पृ.७८) करुणेचं लदबदलेलं जगणं कवी साक्षात जगतो म्हणून ही कविता अस्सल सल घेऊन येते.'हे जिव्हाळ्याचे झरे, माणुसकीचा गहिवर शब्द पेरणी.कातिनीचं जाळं,ही लपवता न येणारी कारूण्याचीओळ,ही कविता आहे की, आपण डोंगरदेही होऊन,मी पायाला डोंगर बांधून फिरलो,मी लिहून दिलं त्याच्या नावे,ही सृजन समर्पक विवेचक रचना देणारी कविता अतिशय संयत शब्दातून येते.जसे"माझे सौदे होणे शक्य नाही आता/तुमची दौलत मला विकत घेऊ शकत नाही/माझा सौदाच फुकटात झाला/आता माझी मालकीन,/माझी मायबाप माझी कविताच हाय "(पृ.८९)हे निश्चित भवभाकीत मनाची मुळगाठ उकल करत 'या देहाची माती झाल्यावर,रूसलेल्या कवितांचा मोहळ, बोलायचं राहुन जाऊ नये म्हणून,मी खांद्यावर कविता घेऊन,यात कवीच्या मनातलं पिंपळपान काढून करुणा संपणार नाही.ही तथागत बुद्धांच्या त्रिशरण पंचशीलांच्या तत्वांचे अधिष्ठान प्राप्त करणारी ही कविता आहे.'मी रोज वाटत असतो पाट्यावर, असं ठाम सांगतो की, पण तुला कळू देत नाही,माणसं मेल्यावर जड होतात नं,हा माणूस मेला नाही,आजी, पाऊस आजी आणि मी, भिंतीवरच्या फोटोतून, काळजीनं लदबदलेला देह,हात, विभक्त होऊ नकोस कधीही,फक्त विषय चुकत होता, दप्तर,बुट आणि.. आपण बाप समजून घेतला का कधी,बाप म्हणून घेतांना.. बाजारातून आणलेल्या खाऊसारखं,माझा जन्मच राखेचा कवी सुनील उबाळे यांच्या कवितांचा हा बाज हा अतिशय नितळ सहज अंतरंगाचा ठाव घेतं ही मनातली वेदना मुखर करते.तर 'एक ओळ लिहिली गेली पाहिजे माझ्या नंतर ही'ही कवितेवर निस्सीम निष्ठा आहे.शाळा, पुस्तक,आजी गणगोत,मुली यांच्या विषयीची भाव कल्लोळ कविता आजही मन गहिवरून टाकते. हा शब्दस्नेह या कवितेने दिला आहे.ख्यातनाम कवीवर्य डॉ.पी.विठ्ठल लिहितात "कवीच्या भाषेच्या सामर्थ्याची जाणीव होते.विशेष म्हणजे भाषेच्या, प्रतिमेच्या तांत्रिक खेळापासून कोसो दूर असललेली ही कविता भूक आणि आत्मसन्मानासाठी संघर्ष करते.मानवी अस्तित्वाचा मतितार्थ उलगडून दाखवते.परस्पर विरोधी आदर्शवादी जगाचा एक आरपार असा एक्स-रे आहे.या कवितेला समजून घेयाचे असेल तर आकलनाचे तात्त्विक व्याकरण उपयोगाचे नाही;तर अत्यंत संवेदनशीलतेने या कवितेतील भावानुभवाशी स्वतःला जोडून घ्यावे लागेल.कारण कवीचे भौतिक आणि मानसिक जग आपल्यापेक्षा खूप भिन्न आहे.आपला सांस्कृतिक अवकाश सर्वार्थाने प्रदुषित होत असल्याच्या काळात इतक्या नितळपणे आत्मभान राखून विवेकाने समकाळाला प्रतिसाद देणे,ही गोष्ट सोपी नाही.सुनील हा आजच्या काळातील निर्विवाद मोठा कवी आहे"(पाठराखण) अतिशय चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक धिरोदत्त हे ब्लर्ब म्हणजे ही कविता ठळक आहे.ख्यातनाम चित्रकार सरदार जाधव यांचे मुखपृष्ठ आशय संपन्न सृजन समर्पक असल्याने 'उलड्या कडीचे घर' मनस्वी स्वानंद देऊन जाते.



**पुस्तकाचे नांव:-उलट्या कडीचं घर (कवितासंग्रह)**
**लेखक:-कवी सुनील दा उबाळे**
**प्रकाशक:-के.एस.अतकरे कैलास पब्लिकेशन, छ. संभाजीनगर**
**मुखपृष्ठ:-सरदार जाधव,**
**प्रथमावृती:-१४एप्रिल २०२४**
**किंमत:-१५०/रूपये, पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,जालना**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १५ ऑगस्ट २०२६

# भारतीय स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्ये - डॉ. राजेंद्र बगाटे

१५ ऑगस्ट हा प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्राभिमान, कृतज्ञता आणि जबाबदारीची भावना जागविणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने ब्रिटिशांच्या दीर्घकालीन वसाहतवादी राजवटीतून स्वातंत्र्य प्राप्त केले आणि एका स्वतंत्र राष्ट्राच्या नव्या पर्वाला प्रारंभ झाला. या दिवसाचे महत्त्व केवळ ध्वजारोहण, राष्ट्रगीत, देशभक्तिपर गीते आणि विविध कार्यक्रमांपुरते मर्यादित नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या मागे अनेक पिढ्यांचा संघर्ष, असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आणि कोट्यवधी भारतीयांच्या स्वराज्याच्या आकांक्षेची प्रेरणा आहे. त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा इतिहासाचे स्मरण करण्याचा दिवस तर केला. स्वदेशी आणि बहिष्काराच्या चळवळीने भारतीयांमध्ये आत्मनिर्भरतेची भावना निर्माण केली. या काळात सामाजिक सुधारणांच्या चळवळीनेही राष्ट्रनिर्मितीला महत्त्वपूर्ण आधार दिला. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण, स्त्रीमुक्तीआहेच; पण त्याचबरोबर स्वातंत्र्याचा अर्थ समजून घेण्याचा, संविधानिक मूल्यांचे महत्त्व जाणून घेण्याचा आणि स्वतंत्र भारताच्या भविष्यासाठी आपली जबाबदारी निश्चित करण्याचा दिवस आहे.भारताला मिळालेले स्वातंत्र्य सहजासहजी प्राप्त झालेले नव्हते. ब्रिटिश सत्तेच्या काळात भारतीयांना अनेक प्रकारच्या शोषणाला सामोरे जावे लागले. या परिस्थितीत परकीय सत्तेविरुद्ध असंतोष वाढत गेला. स्वराज्य आणि स्वाभिमानाची भावना भारतीय समाजात दृढ होत गेली. १८५७ चा उठाव हा ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या संघर्षातील महत्त्वाचा टप्पा ठरला.पुढील काळात भारतीय राष्ट्रीय चळवळीला संघटित स्वरूप प्राप्त झाले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर भारतीयांच्या राजकीय हक्कांसाठी संघर्ष आणि सामाजिक समतेसाठी केलेले कार्य भारतीय समाजाच्या परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा ठरले. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्याय आणि शिक्षणासाठी केलेले कार्य तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समानता आणि मानवी प्रतिष्ठेसाठी केलेला संघर्ष यामुळे स्वातंत्र्याची संकल्पना केवळ परकीय सत्तेपासून मुक्तीपुरती राहिली नाही, तर सामाजिक न्यायाशीही जोडली गेली.महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढ्याला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाच्या माध्यमातून गांधीजींनी सामान्य नागरिकांना स्वातंत्र्याच्या संघर्षात सहभागी करून घेतले. असहकार आंदोलन, मिठाचा सत्याग्रह आणि भारत छोडो आंदोलन या विविध टप्प्यांतून ब्रिटिश सत्तेला भारतीय जनतेच्या सामूहिक शक्तीची जाणीव झाली.भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारकांचे योगदानही अविस्मरणीय आहे. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद आणि असंख्य क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले. महिलांनीही या संघर्षात मोठ्या धैर्याने सहभाग घेतला. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याची गाथा ही संपूर्ण समाजाच्या सामूहिक संघर्षाची गाथा आहे.१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला; परंतु स्वातंत्र्याबरोबर फाळणीची शोकांतिका देशाच्या वाट्याला आली. भारत आणि पाकिस्तान अशी विभागणी झाली आणि मोठ्या प्रमाणावर हिंसाचार व विस्थापन झाले. स्वातंत्र्याचा आनंद आणि फाळणीचे दु:ख या दोन्हींच्या छायेत स्वतंत्र भारताचा जन्म झाला. त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा आनंदाचा दिवस असला तरी तो राष्ट्रीय एकात्मता, बंधुता आणि सामाजिक सलोखा जपण्याची जबाबदारीही आपल्याला स्मरवून देतो.स्वातंत्र्यानंतर भारतासमोर राष्ट्रनिर्मितीची मोठी आव्हाने होती. गरिबी, अशिक्षितता, बेरोजगारी, आरोग्याच्या समस्या आणि आर्थिक मागासलेपण यांवर मात करणे आवश्यक होते. या परिस्थितीत भारताने लोकशाहीचा मार्ग स्वीकारला. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान लागू झाले आणि भारत प्रजासत्ताक बनला. संविधान हे स्वतंत्र भारताच्या राष्ट्रजीवनाचे मूलभूत अधिष्ठान ठरले. संविधानाच्या उद्देशिकेत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. ही मूल्ये केवळ संविधानातील शब्द नाहीत; ती भारतीय लोकशाहीच्या यशाची मूलभूत तत्त्वे आहेत.‘न्याय’ हे संविधानिक मूल्य भारतीय राष्ट्रनिर्मितीचे महत्त्वाचे ध्येय आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाशिवाय स्वातंत्र्याला पूर्ण अर्थ प्राप्त होत नाही. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांना समान संधी उपलब्ध करून देणे, भेदभाव दूर करणे आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची संधी देणे ही न्यायाची खरी कसोटी आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने कायदे आणि धोरणांच्या माध्यमातून सामाजिक न्यायाच्या दिशेने अनेक पावले उचलली आहेत. मात्र सामाजिक विषमता पूर्णपणे नाहीशी करण्यासाठी संविधानिक मूल्यांचे आचरण समाजाच्या प्रत्येक स्तरावर होणे आवश्यक आहे.‘स्वातंत्र्य’ हे भारतीय संविधानाचे आणखी एक महत्त्वाचे मूल्य आहे. विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य नागरिकांना देण्यात आले आहे. परंतु स्वातंत्र्याचा अर्थ मनमानी नव्हे. आपल्या स्वातंत्र्याचा वापर करताना इतरांच्या अधिकारांचा आणि प्रतिष्ठेचा आदर करणे आवश्यक आहे. आजच्या सामाजिक माध्यमांच्या युगात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा झाला आहे. खोटी माहिती, अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि समाजात तेढ निर्माण करणारा मजकूर यामुळे लोकशाही आणि सामाजिक सलोख्याला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे स्वातंत्र्यासोबत विवेक आणि जबाबदारी आवश्यक आहे.‘समता’ हे संविधानिक मूल्य भारतीय समाजासाठी विशेष महत्त्वाचे आहे. जात, धर्म, लिंग किंवा इतर कोणत्याही आधारावर भेदभाव होऊ नये, ही संविधानाची स्पष्ट भूमिका आहे. भारतीय समाजाच्या इतिहासात जातीय विषमता आणि सामाजिक भेदभावाची मोठी परंपरा राहिली आहे. त्यामुळे संविधानाने कायदेशीर समानतेबरोबर सामाजिक न्यायालाही महत्त्व दिले. आज कायद्याच्या दृष्टीने समानता प्रस्थापित झाली असली तरी सामाजिक व्यवहारात समानता पूर्णपणे रुजविण्याचे काम अद्याप बाकी आहे. स्त्री-पुरुष समानता, जातीय भेदभावाचा अंत आणि वंचित घटकांना समान संधी यांसाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.‘बंधुता’ हे भारतीय संविधानातील अत्यंत सुंदर आणि आवश्यक मूल्य आहे. भारताची विविधता ही त्याची मोठी ताकद आहे. अनेक भाषा, धर्म, जाती, पंथ आणि संस्कृती असूनही भारतीय समाज एका राष्ट्रीय भावनेने जोडलेला आहे. ही एकता टिकविण्यासाठी परस्पर आदर, सहिष्णुता आणि मानवी प्रतिष्ठेची जाणीव आवश्यक आहे. मतभेद असणे हे लोकशाहीचे लक्षण आहे; मात्र मतभेदांचे रूपांतर वैरात होऊ नये. दुसऱ्याच्या मताचा आदर करणे, विविधतेचा स्वीकार करणे आणि सामाजिक सलोखा जपणे ही बंधुतेची खरी भावना आहे.भारतीय लोकशाहीचे यश हे संविधानिक मूल्यांच्या प्रत्यक्ष आचरणावर अवलंबून आहे. लोकशाही म्हणजे केवळ निवडणूक आणि मतदान नव्हे. नागरिकांचा सहभाग, प्रश्न विचारण्याचा अधिकार, सत्तेवर नियंत्रण, कायद्याचे राज्य आणि विरोधी मतांचा आदर हे लोकशाहीचे महत्त्वाचे घटक आहेत. मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा आधार असला तरी सुजाणपणे मतदान करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. जात, धर्म, पैसा किंवा क्षणिक भावनांपेक्षा सार्वजनिक हिताचा विचार करून मतदान करणारा नागरिक लोकशाही अधिक मजबूत करतो.संविधानाने नागरिकांना मूलभूत अधिकार दिले असले तरी मूलभूत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली आहे. संविधानाचा आदर करणे, राष्ट्रीय एकता आणि अखंडता जपणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे आणि उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे ही नागरिकांची कर्तव्ये आहेत. आज स्वातंत्र्यदिन साजरा करताना अधिकारांसोबत कर्तव्यांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. अधिकारांचा आग्रह धरणाऱ्या नागरिकांनी आपल्या कर्तव्यांपासून दूर राहणे ही लोकशाहीसाठी योग्य बाब नाही.शिक्षण हे संविधानिक मूल्ये रुजविण्याचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला आपल्या अधिकारांची जाणीव होते, विवेक विकसित होतो आणि सामाजिक प्रश्नांकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची क्षमता प्राप्त होते. शाळा आणि महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी तयार न करता संविधान, लोकशाही, समानता, बंधुता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे संस्कार दिले पाहिजेत. प्रश्न विचारणारा, विचार करणारा, विविध मतांचा आदर करणारा आणि सामाजिक जबाबदारी स्वीकारणारा विद्यार्थी हा भविष्यातील सक्षम नागरिक ठरतो.आजच्या भारतात युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. स्वातंत्र्यलढ्यातील युवकांनी देशासाठी बलिदान दिले. आजच्या युवकांनी ज्ञान, कौशल्य, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून देशाच्या विकासात योगदान द्यावे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि नवउद्योजकता यांसारख्या क्षेत्रांत युवकांसमोर मोठ्या संधी आहेत. मात्र तंत्रज्ञानासोबत विवेक, नैतिकता आणि सामाजिक संवेदनशीलता असणेही आवश्यक आहे. राष्ट्राचे भविष्य केवळ तंत्रज्ञानाच्या प्रगतीत नसून सक्षम आणि जबाबदार नागरिक घडविण्यात आहे.महिलांचे सक्षमीकरण हे संविधानिक समतेचे महत्त्वाचे प्रतीक आहे. महिलांनी शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग, क्रीडा, संरक्षण आणि राजकारण या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तरीही महिलांवरील हिंसा, भेदभाव, असमान संधी आणि आर्थिक परावलंबित्व यांसारखे प्रश्न पूर्णपणे संपलेले नाहीत. स्त्रीला समान प्रतिष्ठा, समान संधी आणि सुरक्षित वातावरण मिळणे ही आधुनिक भारताची गरज आहे. घरापासून कार्यक्षेत्रापर्यंत समानतेची संस्कृती रुजविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.ग्रामीण भारत आणि शेतकरी हे देशाच्या विकासाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. शेती, ग्रामीण रोजगार, जलसंधारण आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणाशिवाय भारताचा सर्वांगीण विकास शक्य नाही. हवामान बदल, पाण्याची कमतरता, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चितता यांसारखी आव्हाने शेतकऱ्यांसमोर आहेत. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि तंत्रज्ञानाच्या समान संधी निर्माण करणे हे सामाजिक न्यायाचेच एक रूप आहे. विकासाची फळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली तरच स्वातंत्र्याचा अर्थ अधिक व्यापक होईल.पर्यावरणसंवर्धन हे आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचे नागरिक कर्तव्य आहे. पाणी, हवा, जंगल आणि जैवविविधता यांचे संरक्षण केवळ वर्तमानासाठी नव्हे तर भावी पिढ्यांसाठी आवश्यक आहे. पाण्याची बचत, वृक्षसंवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि सार्वजनिक परिसराची स्वच्छता यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान दिले पाहिजे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन साधणे ही आजच्या राष्ट्रनिर्मितीची गरज आहे. निसर्गाचा ऱ्हास करून साधलेला विकास दीर्घकाळ टिकणारा ठरू शकत नाही.आज भारत विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, माहिती तंत्रज्ञान, औषधनिर्मिती आणि डिजिटल क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करीत आहे. या प्रगतीचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानामुळे सुविधा वाढत असल्या तरी डिजिटल दरीही लक्षात घेतली पाहिजे. ग्रामीण आणि वंचित समाजघटकांना डिजिटल साधनांची उपलब्धता, माहिती आणि कौशल्ये मिळाली तर तंत्रज्ञान सामाजिक सक्षमीकरणाचे प्रभावी साधन बनू शकते.देशभक्तीचा अर्थही आज नव्याने समजून घेण्याची गरज आहे. देशभक्ती म्हणजे केवळ राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंग्याला सलाम करणे किंवा घोषवाक्ये देणे नव्हे. आपल्या कामात प्रामाणिक राहणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, पर्यावरण जपणे, गरजू व्यक्तीला मदत करणे आणि सामाजिक भेदभावाला विरोध करणे हीदेखील देशभक्तीचीच रूपे आहेत. सीमांचे रक्षण करणारा सैनिक जसा राष्ट्रसेवा करतो, त्याचप्रमाणे प्रामाणिकपणे काम करणारा शिक्षक, शेतकरी, वैज्ञानिक, डॉक्टर, कामगार आणि प्रत्येक जबाबदार नागरिक राष्ट्रनिर्मितीत योगदान देत असतो.भारतीय स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्ये यांचा संबंध अतूट आहे. स्वातंत्र्यलढ्याने भारताला परकीय सत्तेपासून मुक्त केले, तर संविधानाने त्या स्वातंत्र्याला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची दिशा दिली. स्वातंत्र्याने आपल्याला स्वत:चे शासन करण्याचा अधिकार दिला; संविधानाने त्या शासनाची लोकशाही चौकट निश्चित केली. स्वातंत्र्याने राष्ट्रीय अस्मिता निर्माण केली; संविधानाने प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेला समान स्थान दिले. म्हणूनच स्वातंत्र्यदिनाचा खरा उत्सव हा संविधानिक मूल्यांचा सन्मान आणि त्यांच्या आचरणातूनच पूर्ण होतो.आज भारत स्वातंत्र्याच्या ऐंशीव्या वर्षात प्रवेश करीत असताना मागील प्रवासाचा अभिमान बाळगतानाच पुढील वाटचालीचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, शेती, उद्योग, शिक्षण आणि लोकशाहीच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. परंतु सामाजिक विषमता, बेरोजगारी, गरिबी, पर्यावरणीय संकट, शिक्षण आणि आरोग्यातील असमानता यांसारखी आव्हाने अद्याप आहेत. त्यामुळे आर्थिक प्रगतीसोबत सामाजिक न्याय, तंत्रज्ञानासोबत मानवी संवेदना आणि अधिकारांसोबत कर्तव्य यांचा समतोल साधणे आवश्यक आहे.या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण ज्ञात-अज्ञात सर्व स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र अभिवादन करूया. त्यांच्या त्यागाचे स्मरण करून संविधानिक मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याचा संकल्प करूया. न्यायासाठी उभे राहूया, स्वातंत्र्याचा जबाबदारीने वापर करूया, समानतेचा स्वीकार करूया आणि बंधुतेची भावना वाढवूया. जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीला सन्मान देऊया. लोकशाहीतील मतभेदांचा आदर करूया आणि संवादाची संस्कृती मजबूत करूया.स्वातंत्र्य ही आपल्या पूर्वजांनी दिलेली अमूल्य देणगी आहे; परंतु ती पुढील पिढ्यांसाठी अधिक समृद्ध करून ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. स्वातंत्र्यवीरांनी परकीय सत्तेच्या बेड्या तोडल्या; आज आपल्याला अज्ञान, विषमता, सामाजिक द्वेष, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांसारख्या नव्या आव्हानांवर मात करायची आहे. ही लढाई शस्त्रांची नसून ज्ञानाची, विवेकाची, प्रामाणिकपणाची आणि सामाजिक बांधिलकीची आहे.तिरंगा जेव्हा आकाशात डौलाने फडकतो, तेव्हा त्याच्याकडे पाहताना आपल्या मनात केवळ राष्ट्राभिमान नव्हे, तर राष्ट्रीय कर्तव्याची जाणीवही निर्माण झाली पाहिजे. त्या तिरंग्यात स्वातंत्र्यवीरांचा त्याग, संविधाननिर्मात्यांची दूरदृष्टी आणि कोट्यवधी भारतीयांच्या भविष्याची स्वप्ने सामावलेली आहेत. त्या स्वप्नांना साकार करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडणे आवश्यक आहे.म्हणूनच या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण असा भारत घडविण्याचा संकल्प करूया, जिथे प्रत्येक मुलाला शिक्षणाची संधी मिळेल, प्रत्येक युवकाला सन्मानजनक रोजगाराची संधी मिळेल, प्रत्येक महिलेला समानता आणि सुरक्षितता मिळेल, प्रत्येक शेतकऱ्याला सन्मानाने जगता येईल, प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला समान संधी मिळेल आणि कोणत्याही व्यक्तीला जात, धर्म, भाषा किंवा आर्थिक परिस्थितीमुळे अन्याय सहन करावा लागणार नाही. असा भारत निर्माण करणे हीच संविधानिक मूल्यांची खरी अंमलबजावणी ठरेल.भारतीय स्वातंत्र्य ही केवळ भूतकाळातील ऐतिहासिक घटना नाही; ती वर्तमानातील जबाबदारी आणि भविष्याची आशा आहे. संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून भारतीय लोकशाहीचे नैतिक अधिष्ठान आहे. स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्यांचा संगमच भारताच्या राष्ट्रजीवनाला अर्थ देतो. म्हणून स्वातंत्र्यदिन साजरा करताना संविधानाचा सन्मान, लोकशाहीवरील विश्वास, सामाजिक समतेची बांधिलकी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना आपल्या मनात दृढ करूया.स्वातंत्र्य मिळविणे हा आपल्या पूर्वजांचा महान पराक्रम होता; परंतु त्या स्वातंत्र्याला न्याय, समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेने समृद्ध करणे ही आपल्या पिढीची ऐतिहासिक जबाबदारी आहे. आपल्या प्रत्येक जबाबदार कृतीतून संविधानिक मूल्यांना बळ मिळाले, तर स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाला खरी आदरांजली मिळेल. तिरंगा सदैव उंच फडकत राहो, भारतीय लोकशाही अधिक बळकट होत राहो, संविधानिक मूल्यांचा प्रकाश समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचो आणि भारत अधिक समतामूलक, न्याय्य, सक्षम व मानवी राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहो, हीच स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र प्रसंगी मन:पूर्वक शुभेच्छा.

**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल — bagate.rajendra5@gmail.com**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १५ ऑगस्ट २०२६

# तिरंग्याचा इतिहास: स्वातंत्र्यापूर्वी ध्वज ५ वेळा बदलण्यात आला, अशा प्रकारे लाल-हिरव्या रंगांपासून केशरी-पांढरा-हिरवा तिरंगा तयार झाला










भारतीय राष्ट्रध्वजाचा इतिहास: जसा १५ ऑगस्ट जवळ येतो, तसा तिरंगा सर्वत्र दिसू लागतो. शाळांपासून ते सरकारी कार्यालये, बाजारपेठा आणि घरांपर्यंत, आपला तिरंगा देशभक्तीचे सर्वात मोठे प्रतीक बनतो. पण तुम्हाला माहित आहे का की आजचा तिरंगा नेहमीच असा नव्हता? स्वातंत्र्यापूर्वी, भारताच्या राष्ट्रध्वजाची अनेक रूपे उदयास आली आणि काळानुसार त्याचे रंग, चिन्हे आणि रचना बदलत गेल्या. जवळपास चार दशकांच्या या प्रवासात, तिरंग्यात अनेक बदल झाले आणि त्यानंतरच तो केशरी, पांढरा आणि हिरवा या रंगांच्या सध्याच्या स्वरूपात उदयास आला. स्वातंत्र्यदिनी (स्वातंत्र्यदिन २०२६), भारतीय राष्ट्रध्वजाची संपूर्ण कहाणी आणि त्याच्याशी संबंधित मनोरंजक तथ्ये जाणून घ्या.भारतीय राष्ट्रध्वजाचा इतिहास: आज आपण भारताचा अभिमान आणि ओळख म्हणून जो केशरी, पांढरा आणि हिरवा तिरंगा पाहतो, त्याच्यामागे एक मोठी आणि रंजक कहाणी आहे, जी स्वातंत्र्यलढ्यापर्यंत मागे जाते. तुम्हाला माहित आहे का की, सध्याचा तिरंगा होण्यापूर्वी भारतीय ध्वजाची रचना आणि रंग अनेक वेळा बदलले होते? १९०६ च्या कलकत्ता ध्वजापासून सुरुवात करून, १९०७, १९१७ आणि १९२१ मध्ये बदल होत अखेरीस १९३१ मध्ये केशरी, पांढरा आणि हिरवा ध्वज अस्तित्वात आला. त्यानंतर, स्वातंत्र्याच्या अगदी आधी, २२ जुलै १९४७ रोजी, संविधान सभेने सध्याचा राष्ट्रध्वज स्वीकारला, ज्यामध्ये चरख्याच्या जागी निळे अशोकचक्र वापरले गेले. तिरंग्याचे रंग आणि चिन्हे का बदलण्यात आली? कोणता ध्वज प्रथम फडकवण्यात आला आणि सध्याचा तिरंगा कसा निश्चित झाला? स्वातंत्र्यदिनी (स्वातंत्र्य दिन २०२६), भारतीय राष्ट्रध्वजाची संपूर्ण कहाणी आणि त्याच्याशी संबंधित रंजक तथ्ये जाणून घ्या.स्वातंत्र्यापूर्वी तिरंगा पाच वेळा बदलला, लाल आणि हिरव्या रंगांपासून ते केशरी, पांढरा आणि हिरव्या रंगांपर्यंत.आज आपण जो तिरंगा अभिमानाने हातात धरतो आणि 'भारत माता की जय' म्हणतो, त्याच्यामागे एक मोठा ऐतिहासिक प्रवास दडलेला आहे.१. १९०६ चा 'कलकत्ता ध्वज' हा पहिला मोठा प्रयत्न होता.बंगालच्या फाळणीनंतर सुरू झालेल्या स्वदेशी चळवळीदरम्यान भारतासाठी स्वतंत्र राष्ट्रध्वजाच्या कल्पनेला गती मिळाली. ७ ऑगस्ट १९०६ रोजी कलकत्त्यातील पारसी बागान चौकात एक ध्वज फडकवण्यात आला, जो 'कलकत्ता ध्वज' म्हणून ओळखला जाऊ लागला. तो सचिंद्र प्रसाद बोस आणि सुकुमार मित्रा यांनी तयार केला होता.राष्ट्रध्वजाची रचना आतापर्यंत सहा वेळा बदलली असून, काळानुसार त्याचे रंगही बदलले आहेत.भारताला तिरंगा राष्ट्रध्वज कसा मिळाला? तिरंग्यामागील संपूर्ण कहाणी.नेहरूंच्या अचकनपासून ते गांधींच्या खादीपर्यंत, स्वातंत्र्योत्तर काळातील हे फॅशन ट्रेंड आजही लोकप्रिय आहेत.या ध्वजावर सर्वात वर हिरवी पट्टी, मधली पिवळी पट्टी आणि खालची लाल पट्टी होती. सर्वात वर कमळाची फुले, तर खालच्या बाजूला चंद्र आणि सूर्याची चिन्हे कोरलेली होती. मधल्या पिवळ्या पट्टीवर देवनागरी लिपीत 'वंदे मातरम' असे लिहिलेले होते. त्या काळात, हा ध्वज भारतीय अस्मितेचे आणि ब्रिटिश राजवटीविरुद्धच्या स्वदेशी nचळवळीचे प्रतीक म्हणून उदयास आला.२. मादाम कामा यांचा ध्वज परदेशात फडकवण्यात आला.पुढच्या वर्षी , १९०७ मध्ये, भारतीय क्रांतिकारक भिकाईजी कामा यांनी जर्मनीतील स्टटगार्ट येथे एका आंतरराष्ट्रीय परिषदेत भारतीय ध्वज फडकवला. हा ध्वज कलकत्त्याच्या ध्वजासारखाच होता, जरी त्याचे रंग आणि चिन्हे किंचित वेगळी होती.मॅडम कामा यांच्यासोबत विनायक दामोदर सावरकर आणि श्यामजी कृष्ण वर्मा यांचाही या ध्वजाच्या रचनेशी संबंध आहे, तर हेमचंद्र कानुनगो यांनी हा ध्वज तयार केला होता. भारताच्या स्वातंत्र्याचा संदेश जगाला पोहोचवणे हा या ध्वजाचा उद्देश होता. तथापि, त्या काळात या ध्वजाला देशभरात व्यापक लोकप्रियता मिळाली नाही.३. १९१७ च्या होम रूल चळवळीचा ध्वज.बाळ गंगाधर टिळक आणि ॲनी बेझंट यांच्या नेतृत्वाखालील होम रूल चळवळीदरम्यान १९१७ मध्ये आणखी एक ध्वज उदयास आला. या ध्वजावर लाल आणि हिरव्या रंगाचे एकाआड एक पट्टे होते. तसेच त्यावर ताऱ्यांचा समूह आणि चंद्रकोरही होती.या ध्वजाचे सर्वात वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे त्यावर युनियन जॅकची उपस्थिती होती. हे त्या काळातील होमरूल चळवळीच्या मागण्यांचे प्रतिनिधित्व करत होते. या चळवळीचे ध्येय ब्रिटिश साम्राज्यापासून पूर्णपणे वेगळे होणे हे नसून, ब्रिटिश साम्राज्यांतर्गत भारतासाठी स्वशासन मिळवणे हे होते. यामुळेच हा ध्वज स्वातंत्र्याच्या अंतिम मागणीचे प्रतीक बनला नाही.४. १९२१ मध्ये तिरंग्यावर चरख्याचा समावेश करण्यात आला.तिरंग्याच्या इतिहासातील सर्वात मोठा टर्निंग पॉइंट १९२१ मध्ये आला. आंध्र प्रदेशातील डिझायनर आणि व्याख्याता पिंगली वेंकय्या यांनी महात्मा गांधींना ध्वजाचा एक आराखडा सादर केला. त्यात लाल आणि हिरव्या रंगांचा वापर केला होता, जे रंग तेव्हा अनुक्रमे हिंदू आणि मुस्लिम समुदायांचे प्रतिनिधी मानले जात होते.महात्मा गांधींनी एक बदल सुचवला. इतर समाजांचे प्रतिकात्मक प्रतिनिधित्व करण्यासाठी एक पांढरा पट्टा जोडण्यात आला. ध्वजाच्या मध्यभागी एक चरखा ठेवण्यात आला. चरखा हे गांधीजींच्या स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेच्या विचारांचे प्रतीक होते. नागरिकांना स्थानिक वस्त्रे तयार करण्याचे आणि विदेशी मालावर बहिष्कार टाकण्याचे केलेले आवाहनदेखील याच तत्त्वज्ञानाशी सुसंगत होते.१९२३ मध्ये नागपूरमध्ये ब्रिटिश राजवटीविरुद्ध झालेल्या आंदोलनादरम्यान, हा ध्वज हजारो लोकांच्या हातात दिसला. तो बाळगल्याबद्दल अनेकांना अटकही करण्यात आली. हळूहळू, हा ध्वज भारतीय राष्ट्रवाद आणि स्वातंत्र्याच्या लढ्याशी जोडला गेला.५. केशरी-पांढरा-हिरवा रंगसंगम १९३१ साली आला.तिरंग्याच्या इतिहासात १९३१ हे वर्ष महत्त्वपूर्ण मानले जाते. याच वर्षी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ध्वजाच्या नवीन रचनेला मंजुरी दिली. लाल रंगाच्या जागी गडद केशरी रंग वापरण्यात आला आणि वरून खाली केशरी, पांढऱ्या व हिरव्या रंगाचे पट्टे लावण्यात आले.चरखा मध्यभागीच राहिला. इतकेच नव्हे तर, या रंगांना केवळ एका विशिष्ट धर्माशी जोडण्यापलीकडे जाऊन अधिक व्यापक अर्थ देण्यात आले. केशरी रंग शौर्य आणि त्यागाशी, पांढरा रंग शांती आणि सत्याशी, तर हिरवा रंग श्रद्धा, समृद्धी आणि पृथ्वीच्या सुपीकतेशी जोडला गेला. या बदलामुळे तिरंग्याला धार्मिक ओळखीच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीय एकतेचे प्रतीक बनण्यास मदत झाली.स्वातंत्र्याच्या वेळी, चरख्याच्या जागी अशोकचक्र आणले गेले.स्वातंत्र्य येईपर्यंत तिरंग्याची ही रचना लोकांमध्ये बरीच लोकप्रिय झाली होती. तथापि, १९४७ मध्ये राष्ट्रध्वज निश्चित करताना एक मोठा बदल करण्यात आला. २२ जुलै १९४७ रोजी संविधान सभेने भारताचा राष्ट्रध्वज अधिकृतपणे स्वीकारला.केशरी, पांढऱ्या आणि हिरव्या रंगाच्या तीन पट्ट्या कायम ठेवण्यात आल्या, परंतु मध्यभागी असलेल्या चरख्याच्या जागी २४ आऱ्या असलेले निळे अशोकचक्र बसवण्यात आले. हे चक्र सम्राट अशोकाशी संबंधित असलेल्या धर्मचक्रापासून प्रेरित असून, ते शाश्वत प्रगती, नीतिमत्ता आणि न्यायाचे प्रतीक मानले जाते.१५ ऑगस्ट १९४७ रोजी जेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज म्हणून हा तिरंगा पहिल्यांदा फडकवण्यात आला. तेव्हापासून हा तिरंगा देशाची ओळख बनून राहिला आहे.हे सुद्धा वाचा;स्वातंत्र्य दिन विशेष: नेहरूंच्या अचकनपासून ते गांधीजींच्या खादीपर्यंत, स्वातंत्र्य चळवळीतून उदयास आलेले हे फॅशन ट्रेंड आजही लोकप्रिय आहेत.तिरंग्याचा आदर करण्यासाठी नियम आहेत.तिरंग्याकडे केवळ एक ध्वज म्हणून नव्हे, तर राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे, एकतेचे आणि अभिमानाचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. भारताच्या ध्वज संहितेमध्ये त्याच्या आदरासाठी आणि वापरासाठीचे नियम नमूद केले आहेत. हे नियम काळानुसार बदलले आहेत. २००२ मध्ये झालेल्या एका महत्त्वपूर्ण बदलामुळे सामान्य नागरिकांना राष्ट्रध्वज फडकवण्याची परवानगी मिळाली. नंतर, ध्वजाच्या कापडासंबंधीच्या नियमांमध्येही बदल करण्यात आले.याचा अर्थ असा की, आज आपण जो तिरंगा अभिमानाने हातात धरतो आणि 'भारत माता की जय'चा जयघोष करतो, त्याच्यामागे एक मोठा ऐतिहासिक प्रवास आहे. हिरव्या, पिवळ्या आणि लाल रंगांनी सुरू झालेला हा प्रवास, मादाम कामा, होमरूल आंदोलन, पिंगली वेंकय्या आणि महात्मा गांधी यांसारख्या अनेक महत्त्वाच्या टप्प्यांमधून गेला आणि नंतर भगवा, पांढरा आणि हिरवा या तिरंग्यात विकसित झाला. म्हणूनच, दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी जेव्हा तिरंगा आकाशात फडकतो, तेव्हा त्याचे तीन रंग केवळ रंग नसतात, तर ते भारताचा संघर्ष, त्याग, शांतता, विकास आणि एकता यांची संपूर्ण कहाणी आपल्यासोबत घेऊन जातात.

**प्रा.डॉ.सुधीर वैजनाथराव पंचगल्ले**
**वाणिज्य अभ्यास मंडळ**
**सदस्य,डॉ.बाबासाहेब आंबेडकर**
**मराठवाडा विद्यापीठ,छ.संभाजीनगर**